# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./४८०२ /२०२१ दि. ०२/०३/२०२१

## परिपत्रक

विषय:- राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेण्यासाठी ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करणेबाबत.

संदर्भ :- उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. शिआका/२५११/प्रक्र२६/मवि- १/२१०४, दि. १८/०२/२०२१.

विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विभाग प्रमुख तसेच गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येते की, उच्च शिक्षणातील सर्व शिक्षकांना आवाजाचा व्यावसायिक वापर, त्याची काळजी कशी घ्यावी याबाबत ऑनलाईन कार्यशाळाचे आयोजन करणेविषयी उक्त संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्रासोबत संलग्नित प्रतीचे अवलोकन करुन आपल्या स्तरावर सदर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करावे व त्यामध्ये सर्व शिक्षकांना सहभागी होण्यास आवाहन करावे.

संलग्नित - संदर्भिय पत्राची प्रत व माहिती प्रपत्र.

१/३/२०२१

(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर:-

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, विस्तार भवन मुंबई- ४०० ०३२.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र.
५. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
७. पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे सर्व मा. विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे.
८. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
९. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याच्या कार्यवाहीस्तव.
१०. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. विजय सिल्हारे)
उपकुलसचिव (आस्थापना)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune.gov.in | E-Mail : mavt.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२१११,२६०५९५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ | फॅक्स नं.०२०/२६१११९५३.

क्र.: शिआका/२५२१/प्र.क्र.२५/मवि-१. 2105 | दिनांक: १८.०२.२०२

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र
२. कुलसचिव, सर्व अकृषी./अभिमत/ स्वयं अर्थसाहीत विद्यापीठे/ महाराष्ट्र राज्य.

**विषय: राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत.**

संदर्भ: अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांनी मा..मंत्री ,उच्च व तंत्रशिक्षण,विभाग,मंबई. यांना लिहीलेले पत्र क्र. मंत्री/उ व तं.शि/व्ही.आय.पी /१०७/२०२१, दिनांक-९/२/२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त पत्रान्वये उच्च शिक्षणातील सर्व शिक्षकांना आवाजाचा व्यावसायिक वापर ,त्याची काळजी कशी घ्यावी याबाबत ऑनलाईन कार्यशाळा घेण्याकरीता सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच त्यांची कार्यशाळा शिक्षकांसाठी अत्यंत उपयोगाची व उच्च व तंत्रशिक्षण विभागातील गुणवत्ता वाढीसाठी व शिक्षकांच्या आरोग्यासाठी अतिशय सकारात्मक परिणाम करणारी आहे, असेही नमूद केलेले आहे तरी सदर कार्यशाळा आयोजित करणेबाबत आपल्या अधिनस्त तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने.)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण.
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत-

१. स्वीय सहायक, मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई.४०० ०३२.
२. मा.प्रधान सचिव, ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई-४०० ०३२.
३. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र.

MITSC

Voice Clinic
Thane

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि ऑडिओलॉजस्ट व स्पिच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट सोनाली लोहार, वॉईस क्लिनिक, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या संयुक्त विद्यमाने



मा. उदयजी सामंत
कॅबिनेट मंत्री
महाराष्ट्र राज्य उच्च व
तंत्र शिक्षण विभाग

PHOTO

# आवाज गुरुजनांचा- वेध देशाच्या भवितव्याचा

# 'VOICE CARE WORKSHOP

For Teacher

सोनाली लोहार

# प्रस्तावना

भारत आता तरुणांचा देश म्हटला जातो. या तरुणांच्या देशांमध्ये 70 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या जेव्हा युवा आहे, तेव्हा निश्चितच एक आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीयाला खुणावत आहे. या युवकांच्या हाताला काम आणि डोक्याला विचार देण्यासाठी सर्वात मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी आहे ती आपल्या शिक्षकांच्या वर. "गुरु विना कोण दाखवील वाट' हे संतांचे पाठांतर करत करत मोठी होणारी पिढी करिअरच्या वाटेवर प्रत्येक वेळी मार्गदर्शनासाठी ज्यांच्याकडे भक्तीने पाहते ते म्हणजे आपण सर्व शिक्षक! समाजामध्ये कलाकार, राजकीय नेतृत्व करणारी मंडळी, व्यावसायिक नेतृत्व करणारी मंडळी हे सर्व 'प्रोफेशनल व्हाईस यूज़र' म्हणून गणले जातात. पण माझ्यासाठी या सर्वांच्या पेक्षा जास्त महत्वाचा आहे तो आपला शिक्षक आणि या शिक्षकाचा आवाज !

आवाजाची काळजी घेण्यासाठी आणि आवाजाची पोत सुधारण्यासाठी, त्याचबरोबर व्यावसायिकदृष्ट्या अधिकाधिक अचूकपणे आवाजाचा वापर करण्यासाठीची क्षमता प्रत्येक शिक्षकांच्यामध्ये असणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे आवाजच शास्त्र समजून घेणे, आवाज निर्माण कसा होतो हे जाणून घेणे, त्याचप्रमाणे शरीरामध्ये दीर्घकालीन परिणाम करणारे काही आजार होत असताना आवाजाच्या माध्यमातून त्यांची चाहूल सगळ्यात आधी कशा रितीने लागू शकते हे जाणून घेणे. संवादाच्या या सगळ्यात महत्वाच्या माध्यमाची काळजी कशी घ्यावी, हे सर्व प्रत्येक शिक्षकाला माहीत असले पाहिजे असे मला वाटते. त्यामुळेच आम्ही घेऊन आलो आहोत आपल्यासाठी, आपल्या सर्व युवा पिढी घडवणाऱ्या शिक्षकांसाठी, प्राध्यापकांसाठी आणि या सर्व शिक्षण व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांसाठी एक 'आवाजाची कार्यशाळा'!

# माहिती पत्रक

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व ऑडिओलॉजिस्ट व स्पिच लॅंग्वेज पॅथॉलॉजिस्ट सोनाली लोहार, वॉईस क्लिनिक, ठाणे यांच्या संयुक्त विद्‌यमाने उच्च माध्यमिक शिक्षक व प्राध्यापक यांच्या आवाजाची काळजी घेतली जावी व आवाज प्रभावी बनावा' यासाठी 'Voice Care' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकांच्या आवाजाचे स्वास्थ्य ही एक अत्यंत महत्वाची पण दुर्लक्षित बाब आहे. जागतिक स्तरावर याबाबत आता जागरूकता येत आहे. त्याचप्रमाणे प्राध्यापकांचे व्यक्तिमत्वही विद्‌यार्थ्यांना अनुकरणीय असले पाहिजे आणि आवाज हे व्यक्तिमत्वाचे महत्वाचे अंग आहे. आपण सर्वजण कोल्हापूर, महाराष्ट्रातल्या किंबहुना भारताच्या भवितव्यासाठी महत्वाचे शिल्पकार आहात. यामुळे माझे आपणा सर्वांना आवाहन आहे की, अत्यल्प सेवाशुल्क आकारून घेत असलेल्या या कार्यशाळेमध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे व आपल्या आवाजाचे भविष्य सुरक्षित करावे. आपल्या कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा!

# कार्यपद्धती


**उच्च व तंत्रशिक्षण विभागाची जबाबदारी** – सदर उपक्रम प्रत्येक शिक्षकांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच सहायक शिक्षण संचालकांच्या मदतीने महाविद्यालयापर्यंत उपक्रमाची माहिती पोहचवणे. सदर उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे की नाही, यासाठी वेळोवेळी अहवाल मागवुन घेणे व गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करणे.

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राची जबाबदारी**- आवश्यक असणारी सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक असणारे सर्व व्याख्याते, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे. शिक्षकांच्यापर्यंत माहिती पोहचण्यासाठी नियमित उपक्रमाची दिनदर्शिका उपलब्ध करून देणे, उपक्रम नियमितपणे व सुरळीत सुरू राहण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभी करणे.

**विद्यापीठस्तरीय जबाबदारी** –संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

**महाविद्यालयांची जबाबदारी**- महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

# व्यवस्थापकीय रचना



# नाव नोंदणीसाठी आवश्यक

- कालावधी - ३ तास
- नोंदणी शुल्क - १५३५/-
- ऑनलाईन नोंदणी फॉर्म
- शैक्षणिक संस्थेचे ओळखपत्र
- फोटो
- संस्था प्रमुखाचे शिफारस पत्र
- प्रथम नोंदणी प्रथम प्राधान्य

# नोंदणी प्रक्रिया

Google Form

https://forms.gle/gxUQbJjLzLW4k9K29

↓

Payment Link

https://gpay.app.goo.gl/pay-rGPYCYuWeDZ

↓

Date Confirmation

↓

Workshop Participation

↓

Certification